www.rajdand.com
पुणे, सोमवार
20.02.2023
पृष्ठ : ४ | मूल्य : ₹ ४.०० | माघ कृ.१५
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



महाशिवरात्री निमित्त शिंगणापुरात भरला शिवभक्तांचा मेळा
पान ४ वर..

# २०२४ मध्ये भाजप-शिवसेना एकत्र लढणार

## अमित शहांनी महाराष्ट्रात फुंकले निवडणुकीचे रणशिंग; म्हणाले... धोकेबाजांना धडा शिकवा!

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**जेव्हा जेव्हा मी कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे दर्शन घेतले तेव्हा तेव्हा भाजपला यश मिळालेले आहे. असे म्हणत अमित शहा यांनी आगामी निवडणुका भाजप आणि शिवसेना एकत्रित लढणार असल्याची घोषणा कोल्हापूरात केली. यावेळी त्यांनी 'मिशन इलेक्शन'ला अप्रत्यक्षपणे सुरुवात करत असल्याचे सांगितले.**


केंद्रीय गृहमंत्री अमित शहा कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री अंबाबाईचे दर्शन घेतले. त्यानंतर अमित शहा यांनी भाजप विजय संकल्प सभेस संबोधित केले. यावेळी ते बोलत होते.

अमित शहा म्हणाले, २०२४ च्या निवडणुक अभियानासाठी मी याठिकाणी आलेलो आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपचा विजय म्हणजे समृद्ध भारताची रचना होय. आता महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेना एकत्रित लढतील तर उरलेसुरले त्यांच्या विरोधात एकत्र लढतील.

अमित शहा म्हणाले, महाविकास आघाडीतील तीन पक्षांसह प्रकाश आंबेडकर आपल्याविरुद्ध लढणार आहे. मात्र पुढची निवडणूक भाजपचे सरकार स्थापन करण्यासाठी नाही, पुढची निवडणूक मोदींना पंतप्रधान बनविण्यासाठी नाही. तर २०२४ ची निवडणूक महान भारताच्या रचनेसाठी आणि समृद्ध भारत बनवण्यासाठी आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पत्नी सोनल शहा यांच्यासह अंबाबाई मंदीरात कुंकूमार्चन पूजा केली. तसेच 'आई अंबाबाई, सर्वांना सुख, समृध्दी दे!' अशी प्रार्थना त्यांनी केली. यावेळी मंत्री दीपक केसरकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने यांची उपस्थिती होती.

२०२४ मध्ये भाजपचा विजय नक्की होणार, असा विश्वास अमित शहा यांनी व्यक्त केला. पुढे



शहा म्हणाले, दहशतवादावर लढण्याची काँग्रेसच्या काळात कोणामध्ये हिम्मत नव्हती. काँग्रेस सरकारमध्ये पंतप्रधानांना कुणी विचारत नव्हते. या ९ वर्षांच्या कालावधीत ९ करोड गरिब महिलांना गॅस सिलिंडर मिळाले. ७० वर्षांनंतर धूरमुक्त वातावरणात त्या महिला श्वास घेत आहेत.

अमित शहा म्हणाले, २००४ ते २०१४ पर्यंतच्या काळात कोणाही पंतप्रधानांना पंतप्रधान मानत नव्हते. सगळे स्वत:लाच पंतप्रधान समजायचे. दररोज भ्रष्टाचाराच्या बातम्या येत होत्या. सरकार चालवणाऱ्यांना कळत नव्हते की, कोण आज आपल्या डोक्यात टपली मारेल. दररोज पाकिस्तान भारतात घुसखोरी करत होते. पाकिस्तानविरुद्ध भूमिका घेण्याची कोणाची हिंमत नव्हती

अमित शहा म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी घरोघरी शौचालय, वीज पोहोचवली. मोदी यांनी २०१९ मध्ये रामजन्मभूमीचा पाया ठेवला. मोदी यांनी ट्रिपल तलाक कायदा रद्द केला, याबाबत कधी विचार केला होता का? असा सवाल अमित शहांनी उपस्थित केला. कलम ३७० मोदींनी रद्द केला. शरद पवार यांची राष्ट्रवादी, राहुल बाबांची काँग्रेस, ममता-समता, सपाचा ३७० कलम हटवण्याला विरोध होता.

अमित शहा म्हणाले, संपूर्ण ७० वर्षांचे काम नरेंद्र मोदी यांनी ७ वर्षात पूर्ण केले. अटलबिहारी वाजपेयी यांनी अर्थव्यवस्थेला ११ व्या क्रमांकावर आणले. तर मनमोहन सिंग यापुढे जाऊ शकले नाही. मोदी यांनी याच अर्थव्यवस्थेला ५ व्या क्रमांकावर आणले.

अमित शहा म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी भाजपसोबत युती असताना प्रचारासाठी मोदी यांचे मोठे फोटो लावले. तर स्वत:चे छोटे फोटो लावले. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात निवडणुका लढल्या. निवडणुकीनंतर यांच्या तोंडाला पाणी सुटले. आणि ठाकरे शरद पवारांच्या पायात जाऊन पडले. आम्हाला सत्तेचा लोभ नव्हता.

अमित शहा म्हणाले, आपल्याला बहुमत नाही तर संपूर्ण विजय हवाय. ४८ च्या ४८ जागा जिंकायच्या आहेत, असे वक्तव्य केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात महान भारताची रचना करायची आहे. ज्यांनी धोका दिलाय त्यांना धडा शिकवू.

## आता लढाई सुप्रीम कोर्टात; मंगळवारपासून सत्तासंघर्षाची तीन दिवस सलग सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**




महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर सलग तीन दिवस आता सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात २१ ते २३ फेब्रुवारीपर्यंत घटनापीठ सुनावणी घेणार आहे. निवडणूक आयोगाच्या निकालाबाबत ठाकरे गट आक्षेप घेण्याची शक्यता आहे. न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली पाच न्यायमूर्तींचे घटनापीठ हे महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सुनावणी करत आहे. मागच्या आठवड्यात सलग तीन दिवस सुनावणी झाली होती आणि त्याच्यानंतर हे प्रकरण सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे द्यायचं की नाही? याबाबत न्यायमूर्तींनी आपलं मत नोंदवलं होतं. त्यानंतर आता या आठवड्यात २१, २२ आणि २३ म्हणजे सलग तीन दिवस याप्रकरणी घटनापीठाचं कामकाज होण्याची शक्यता आहे. यादरम्यान केंद्रीय निवडणूक आयोगाचा जो निर्णय आला आहे, त्यासंदर्भात ठाकरे गटाला आक्षेप आहे. याबाबतही युक्तिवाद या तीन दिवसात केला जाऊ शकतो. ही खूप महत्वाची सुनावणी असून घटनापीठाने एका आठवड्यानंतरची तारीख दिली होती. त्यामुळे आता या प्रकरणाची सुनावणी आता आणखी वेगाने सुरु झाली आहे.

तत्पूर्वी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने सत्तासंघर्षाच्या प्रकरणात एक मोठा निर्णय दिला. सत्तासंघर्षाचं प्रकरण सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे वर्ग करावं, अशी विनंती ठाकरे गटाने घटनापीठाकडे केली होती. याचप्रकरणी निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने राज्यातल्या सत्तासंघर्षाची सुनावणी तूर्तास ५ न्यायमूर्तींचंच घटनापीठच करणार असल्याचं सांगितलं. ठाकरे गटानं यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल केली होती आणि हे प्रकरण ७ न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे वर्ग करावं, अशी विनंती घटनापीठाकडे केली होती. या प्रकरणावर गेले तीन दिवस सलग सुनावणी झाली होती. सर्वोच्च न्यायालयानं दोन्ही बाजूंचं म्हणणं ऐकून घेतलं आणि अखेरीस न्यायालयाने या प्रकरणावर १७ फेब्रुवारी निर्णय सुनावला.

## वाकळवाडी येथे ७५ किलोची अफूची झाडे जप्त





### पोलिसांची मोठी कारवाई

**वडूज : प्रतिनिधी**

वाकडवाडी तालुका खटाव येथील शेतात लावलेला तब्बल ७५ किलो अफू वडूज पोलिसांनी छापा टाकून जप्त केला आहे याबाबत वडूज पोलीस स्टेशनमध्ये तिघांवर आपुची शेती केल्याप्रकरणी अमली औषधी द्रव्य व मन प्रभावी पदार्थ अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की वाकळवाडी तालुका खटाव येथील शिवारात सुमारे एक गुंठ्या मध्ये अफूची लागवड केली असल्याची माहिती वडूज पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मालोजीराव देशमुख यांना मिळाली मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी संबंधित ठिकाणावर कर्मचाऱ्यां सह छापा टाकला. या छाप्या दरम्यान वाकळवाडी शिवारात शांताराम रामचंद् म्होप्रेकर, चंद्रप्रभा शिवाजी म्होप्रेकर विमल पंढरीनाथ म्होप्रेकर सर्व राहणार वाकळवाडी यांनी स्वा मालकीच्या शेतात त्यांच्या शेताच्या मधोमध गहू हरभरा कांदा पिकाच्या आडोशाला महाराष्ट्र राज्यात बंदी असलेले मानवी शरीरास अपायकारक असणारे गुंगीकारक अफूची लागवड करून त्याचे आर्थिक हिता करता संवर्धन व जोपासना केल्याचे दिसून आले. सदर पिक लागवडीनंतर सुमारे दोन ते अडीच फूट उंचीचे ओलसर हिरवीगार पान त्यांना पांढरे फुले व हिरवे गोलाकार बोंडे असलेली पान फुलांचे तयार झालेल्या सात गोण्या त्याचे वजन ७५४८० की.ग्रा. त्याची किंमत एक लाख ५२ हजार ७०० असा माल वडूज पोलिसांना आढळून आला. औषधी द्रव्य व मन प्रभावी पदार्थ अधिनियम कलमानुसार वडूज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

या कारवाईमध्ये दादा देवकुळे,संदीप शेडगे, दऱ्याबा नरळे, दीपक देवकर,भूषण माने,शिवाजी खाडे, सागर बदडे, मेघा जगताप, वृषाली काटकर यांनी सहभाग घेतला. गुन्ह्याची फिर्याद पोलीस उपनिरीक्षक शितल पालेकर यांनी दिली असून अधिक तपास अधिक तपास मालोजीराव देशमुख करत आहेत.

## एक कोटी आठ लाख रुपयांच्या अपहारातील फरार आरोपी जेरबंद

### सातारा आर्थिक गुन्हे शाखेचे यश

**सातारा : प्रतिनिधी**

एक कोटी आठ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणातील फरार आरोपी जेरबंद करण्यात सातारा आर्थिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो को-ऑपरेटिव्ह सोसायटी, साखरवाडी, ता. फलटण येथील कंपनीत चेअरमन, संचालक व इतर यांनी सामान्य जनतेला आर्थिक लाभाचे आमिष दाखवून त्यांना कंपनीच्या विविध प्लॅनमध्ये पैसे गुंतवण्यास सांगून सामान्य जनतेची आर्थिक फसवणूक केल्याबाबत २९ जून २०२२ रोजी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा अधिक तपास सातारा आर्थिक गुन्हे शाखा करत आहे. या गुन्ह्याच्या तपासामध्ये आज अखेर एक कोटी आठ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्यातील सोमनाथ खंडू नेहे रा. पाथर्डी फाटा, नाशिक आणि ज्ञानेश्वर तुकाराम गाढवे रा. बोपर्डी, ता. वाई यांचा मागील आठ महिन्यांपासून पोलीस शोध घेत असताना ते सापडत नव्हते. यातील ज्ञानेश्वर गाढवे यास दिनांक ६ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली होती. मात्र सोमनाथ नेहे हा सापडत नव्हता. त्याला अटक करण्यासाठी पथकही तैनात करण्यात आले होते. त्यानुसार सोमनाथ नेहे हा १७ फेब्रुवारी रोजी पुणे येथे येणार असल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस नाईक जाधव यांना मिळाली. त्यानंतर केलेल्या तांत्रिक विश्लेषणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणी सापळा लावून पथकातील अधिकारी आणि अंमलदार यांनी सोमनाथ नेहे यास जेरबंद केले. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. त्याच्यावर एकूण ३७ गुन्हे नाशिक येथे दाखल आहेत.

या कारवाईत पोलीस अधीक्षक समीर शेख अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपअधीक्षक मोहन शिंदे यांच्या अधिपत्याखाली तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश गेंगजे पोलीस हवालदार प्रशांत ताटे पोलीस नाईक मनोज जाधव संजय मोरे चालक संतोष राऊत यांनी सहभाग घेतला.

## चीनच्या कुरापती सुरूच, सीमेजवळ रेल्वे लाईन उभारणीचं काम हाती

■ अक्साई भागात पँगॉग सरोवराजवळ बांधकाम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारत आणि चीन यांच्यातील तणाव सर्वज्ञात आहे. चीनच्या कुरापती सुरुच आहेत. चीन सीमावर्ती भागात सातत्याने बांधकाम करुन सोयी-सुवाधा वाढवण्यावर भर देत आहे. आता चीन डअउ जवळ नवीन रेल्वे लाईन उभारण्याची तयारी करत असल्याचं समोर आलं आहे. ही भारतासाठी चिंतेची बाब आहे. ही प्रस्तावित रेल्वे लाईन प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आणि वादग्रस्त अक्साई चीन परिसरातून जाईल.

चीन सीमावर्ती भागात हालचाली कायम आहे. या पार्श्वभूमीवर भारत सीमेलगतच्या भागात पायाभूत सुविधा अधिक मजबूत करत आहे. रेल्वे तंत्रज्ञान विभागाच्या रिपोर्टनुसार, या प्रस्तावित रेल्वे मार्गामुळे भारत आणि नेपाळपासून चीनच्या सीमेपर्यंत नवीन मार्ग तयार करण्यात येईल. हा नवीन रेल्वे मार्ग तिबेटमधील शिगात्से येथून सुरू होईल आणि वायव्येकडील नेपाळ सीमेजवळून जाईल.

भारत आणि चीन सीमावादाच्या पार्श्वभूमीवर चीनचे हे पाऊल भारत आणि तिबेट या दोन्ही देशांची चिंता वाढवणारं आहे. भारताचा अक्साई चीन (सुमारे ३८,००० चौरस किमी क्षेत्र) चीनच्या ताब्यात होता. हा भाग दोन्ही देशांमधील वादाचा मुद्दा राहिला आहे. रेल्वे तंत्रज्ञानाने आपल्या अहवालात सांगितले आहे की, तिबेटची 'मध्यम ते दीर्घकालीन रेल्वे योजना' २०२५ पर्यंत ढअठ रेल्वे नेटवर्कचे सध्याच्या १,४०० किमीवरून ४,००० किमीपर्यंत विस्तार करण्यास मदत करेल. तिबेट स्वायत्त प्रदेश (ढअठ) सरकारने जारी केलेल्या नवीन रेल्वे योजनेत हे उघड झालं आहे.

मिळालेल्या अहवालानुसार, चीनच्या या नव्या प्रकल्पामध्ये भारत आणि नेपाळपासून चीनच्या सीमेपर्यंत नवीन रेल्वेमार्गांचा समावेश असेल. हा नवीन रेल्वे मार्ग तिबेटमधील शिगात्से येथून सुरू होईल आणि वायव्येकडील नेपाळ सीमेजवळून जाईल. यापुढे अक्साई चिनच्या उत्तरेतून जाऊन शिनजियांगमधील होटन येथे संपेल.

सध्या चीन भारत आणि नेपाळ सीमेपर्यंत रेल्वेचे जाळे विस्तारण्याची तयारी करत आहे. रेल्वे तंत्रज्ञानाच्या रिपोर्टनुसार, चीनच्या तिबेट स्वायत्त प्रदेश (ढअठ) सरकारला ढअठ चे रेल्वेचं जाळं ४,००० किमीपर्यंत वाढवायचं आहे. सध्या हे जाळं १,४०० किमीपर्यंत पसरलेलं आहे. भारत-नेपाळ सीमेपर्यंत रेल्वेचे जाळे विस्तारण्याची चीनची जोरदार तयारी सुरू आहे. तिबेटमध्ये स्वायत्त सरकार आहे असे चीन म्हणत असलं तरीही हे सरकार चीनच्या इशाऱ्यावर चालते. त्यामुळे रेल्वे विस्ताराचं हे पाऊल भारतासाठी चिंताजनक आहे.

## गडी एकटा निघाला...! राहुल कलाटेंच्या प्रचार गाण्यांचा सोशल मिडीयावर धुमाकूळ

**पुणे : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत बंडखोरी करुन अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी राज्याचं लक्ष वेधून घेतलं. त्यांच्या बंडखोरीमुळे आता चिंचवडमध्ये तिरंगी लढत होणार आहे. त्यामुळे भाजप, राष्ट्रवादी बरोबरच राहुल कलाटेंचाही प्रचार जोरात सुरु आहे. सामान्यांच्या भेटी घेत, पदयात्रा काढत वरिष्ठांचा अशिर्वाद घेत त्यांचा प्रचार सुरु आहे. मात्र यातच त्यांच्या प्रचार गाण्यांनी लक्ष वेधून घेतलं आहे. या प्रचार गाण्यांना लोक व्हॉट्सॲप स्टेटस ठेवत आहेत. नवीन मतदार राहुल कलाटे यांना युथ आयकॉन म्हणून पाहत असल्याचं समोर आलेय.

'ना कुठला पक्ष, ना कुठला नेता, माझा आधार फक्त मायबाप जनता' आणि बटन शिट्टीचा दाबाल... अशी ही त्यांची प्रचार गाणी मतदारांमध्ये लोकप्रिय होत आहेत. कलाटे हे विविध प्रश्न सोडवू शकतात असा विश्वास या गाण्यांमधून नागरिकांना दिला जात आहे. कलाटे हे जल्लोषात प्रचार करत आहे. त्यांना मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, विकासाचे प्रश्न अशा विविध समस्या आपण सोडवू, असे आश्वासन त्यांनी मतदारांना दिले आहे. पुनावळे, रहाटणी आणि पिंपळे निलख येथील मतदारांशी नुकत्याच झालेल्या भेटींमध्ये कलाटे यांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

कलाटे यांची प्रमोशनल गाणी चिंचवड शहरात चर्चेत असून मतदार त्यांना व्हॉट्सॲपवर शेअर करून पाठिंबा दर्शवत आहेत. विकासाचे प्रश्न सोडवण्यात कलाटे हेच त्यांच्यासाठी सर्वोत्तम पर्याय आहेत, असा विश्वास दिसत आहे.

## तो दिवस दूर नाही, ज्या दिवशी लोकं ड्रोनमध्ये बसून विमानतळावर जातील - नितीन गडकरी

### लोकसभा निवडणुकीपूर्वी एक लाख जणांना रोजगार देणार, गडकरींची घोषणा

**नागपूर : प्रतिनिधी**

भारतामध्ये सध्या ड्रोन क्षेत्रात मोठी प्रगती होत आहे. त्यामुळे तो दिवस दूर नाही, ज्या दिवशी ड्रोनमध्ये बसून लोक विमानतळावर जातील, असे वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. ते नागपूरमध्ये बोलत होते. यावेळी त्यांनी नागपूरमधील पाच हजार तरुणांना लवकरच नोकऱ्या मिळतील, असेही सांगितलं.

ड्रोनच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती होतं आहे. त्यामुळे तो दिवस दूर नाही जेव्हा चारजण ड्रोनमध्ये बसून विमानतळावर जातील, असा नवा दावा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केला आहे. ते नागपूरात फॉरच्युन फाउंडेशनच्या युथ एम्पॉवरमेंट समिटच्या समारोपीय कार्यक्रमात बोलत होते. गडकरी यांच्या या दाव्याची सध्या चर्चा होत आहे. यावेळी बोलताना गडकरी म्हणाले की, आज शेतीची फवारणी असो अथवा डोंगरावरुन वजनी साहित्य खाली उतरविणे असो... अनेक कामे ड्रोनमुळे कमी पैशात होत आहेत. त्यामुळे भविष्यात ड्रोन क्षेत्रात प्रगती होऊन चार माणसं बसून काही अंतरावर सहज जाऊ शकतील.

**५ हजार जणांना नोकऱ्या -**

लवकरच नागपुरातील मिहानमध्ये इन्फोसिसचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे जवळपास ५ हजार नागपूरकरमधील तरुणांना नोकऱ्या मिळतील, असा दावा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केला.

**एक लाख जणांना रोजगार, गडकरींचा संकल्प -**

नागपूरातील विशेष आर्थिक क्षेत्र मिहानमध्ये ३१ मार्चला इन्फोसिसच उदघाटन करणार आहे. त्यातून ५ हजार नागपूरकर तरुणांना रोजगार मिळणार असल्याची माहिती गडकरी यांनी यावेळी दिली. मिहानच्या माध्यमातून आतापर्यंत ८७ हजार जणांना रोजगार मिळाला असून पुढील लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापुर्वी १ लाख लोकांना मिहानमध्ये रोजगार मिळेल, असा संकल्प केल्याचेही यावेळी गडकरी म्हणाले. राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली पाहिजे. त्यासाठी उद्योग आले पाहिजेत. उद्योग व्यापार वाढला तर रोजगार निर्मिती होईल. रोजगार निर्मितीच्या नवनवीन संधी शोधल्या पाहिजेत.



**प्लॅस्टिकपासून पेट्रोल**

प्लॅस्टिकपासून क्रूड पेट्रोल काढण्याचा नवीन प्रकल्प सुरू करत आहे. पुढील तीन महिन्यात प्रकल्प सुरू होईल, अशी आपेक्षा आहे. हे पेट्रोल डिझेलध्ये वापरता येईल. त्यावर ट्रक, बस चालू शकेल.

# कालीचरण सोलनकर 'त्रिमूर्ती केसरी'चा मानकरी



**अकलूज : प्रतिनिधी**

शंकरनगर-अकलूज येथे झालेल्या त्रिमुर्ती केसरी स्पर्धेमध्ये साडेसहा पुट उंच व शक्तीशाली असलेल्या वैभव माने समोर कालीचरण सोलनकर हा अगदीच लहान वाटत होता. परंतु सुरुवातीपासूनच अत्यंत आक्रमक खेळ वेळोवेळी पटाला लागत कालीचरणने वैभवला झुंजवत ठेवले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या कुस्तीमध्ये कालीचरण वैभव मानेवर एका गुणाने बढ़त घेऊन त्रिमुर्ती केसरीचा खिताब आपल्या नावे केला.

महाशिवरात्र यात्रेनिमित्त शंकरनगर-अकलूज येथे सालाबादप्रमाणे त्रिमुर्ती केसरी कुस्ती स्पर्धा पार पडल्या. १ लाख रूपये रोख व त्रिमुर्ती चषकासाठी सहाव्या फेरीनंतर वैभव माने व कालीचरण सोलनकर हे एकमेकांसमोर आले. पहिल्या २० मिनिटांमध्ये दोघांनी एकमेकांच्या ताकदीचा अंदाज घेतला. यावेळी कालीचरण सतत वैभवचा पट काढण्याचा प्रयत्न करत होता. परंतु वैभवने त्याला दाद दिली नाही. त्यानंतर पंचांनी सदर कुस्ती गुणांवर सुरू केली. यावेळी वैभवने भारंदाज डावावर ६ गुण मिळवत आघाडी घेतली. पण ही आघाडी त्याला जास्तवेळ टिकवून ठेवता आली नाही. कालीचरणने पट काढत व कब्जा घेत ६ गुण मिळवले. त्यानंतर वैभवने पुन्हा दोन गुण घेतले. पण कालीचरणने परत कब्जा घेत गुणांची बरोबरी केली. त्यानंतर परत दोघांनी दोन दोन गुण घेतले. शेवटच्या मिनिटांत वैभवसमोर लहानगा वाटणाऱ्या कालीचरणने १ गुण मिळवत त्रिमुर्ती केसरीचा बहुमान पटकावला.

सदर कुस्ती स्पर्धा दि. १७ ते १९ फेब्रुवारी २३ दरम्यान विविध वजन गटांमध्ये व खुल्या गटामध्ये खेळवण्यात आल्या. स्पर्धेचे उदघाटन युवानेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. आज दि. १९ रोजी त्रिमुर्ती स्पर्धेच्या दरम्यान जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, धैर्यशील मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संग्रामसिंह मोहिते-पाटील, नितिनराजे निंबाळकर भोजराज माने राजेंद्र चौगुले, पोपटराव भोसले, वसंत जाधव, अभयसिंह माने देशमुख, सहकार महर्षि कारखान्याचे सर्व संचालक, प्रताप क्रीडा मंडळाचे सर्व सदस्य, यात्रा कमिटीचे सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

या स्पर्धेतील विविध वजन गटातील विजेते २५ किलो संग्राम जाधव रुई, २८कि.आदित्य सावंत इंदापूर, ३० कि. सुजल गोरड खुडूस, ३२ कि.हर्षवर्धन पवार खुडूस, ३५कि राजवीर मोरे अकलूज, ४० कि.प्रणव हिमने शिरसवाडे, ४५ कि. यशराज मोरे अकलूज, ५० कि.विवेक सातपुते म्हसवड, ५५ कि.विशाल सुरवसे खुडूस, ६० कि.विशाल रूपनवर म्हसवड, ६५ कि.विकी कडे नातेपुते, ७० कि. किरण राणे नातेपुते, ७५ कि.संदेश शिंपकुले फलटण, ८० कि.किरण माने जेऊर, ८५ कि.अविनाश गावडे सराटी यांनी यश संपादन केले.

# महर्षि संकुल यशवंतनगर येथे शिवजयंतीनिमित्त महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन

**अकलूज : प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित महर्षि संकुल येथे शिवजयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. प्रमुख अतिथी युवा नेते सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते -पाटील यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले .कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉक्टर विश्वनाथ आवड -इतिहास संशोधक व साहित्यिक, ज्येष्ठ विधीज्ञ नितीनराव खराडे सभापती स्थानिक प्रशाला समिती यशवंतनगर पोपट भोसले पाटील सचिव प्रताप क्रीडा या मान्यवरांनी प्रतिमेला अभिवादन केले.




विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी आपल्या प्रास्ताविकात शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान महर्षि संकुलाच्या वतीने करण्यात आला. महर्षि वाद्यवृंदाने नुकत्याच राज्यगीत म्हणून दर्जा मिळवलेल्या जय जय महाराष्ट्र माझा गीताचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. संकुलातील विद्यार्थी स्वयम सगर ,वेदांत मुटकुळे ,शिवतेज केंदळे यांनी अभिरूप छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली .संकुलातील विद्यार्थी सिद्धी वाघ ,आराध्या चुंगे ,मयूर मोरे यांनी आपल्या तडफदार भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला शब्दांजली वाहिली.

डॉ. विश्वनाथ आवड आपल्या भाषणात म्हणाले की ,छत्रपती शिवाजी महाराजांसारखे सूक्ष्म नियोजन व परिपूर्ण प्लॅन आखूनच यशाचा केंद्रबिंदू गाठता येतो. अनेक प्रसंगाचा उहापोह करून त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राचे निरूपण केले.

कार्यक्रमाप्रसंगी संकुलातील बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ प्रमुख अतिथींच्या हस्ते संपन्न झाला. प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक प्रा. धीरज गुरव यांना सन्मानित करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमासाठी प्रशाला समिती सदस्य कैलास चौधरी, नितीन इंगवले देशमुख, अनिल जाधव, मुख्याध्यापिका सविता गायकवाड संकुलातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी रचना रणनवरे,प्रतिभा राजगुरू, हासिरुन मुलाणी शिला धाईंजे,बिभीषण जाधव,मनोज सरवदे आकाश कदम ,अभिजित बावळे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाझिया मुल्ला व किरण सुर्यवंशी यांनी केले तर आभार प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी पारसे यांनी मानले.

# छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संगम येथे १११ रक्तदात्यांचे रक्तदान

**अकलूज : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन बाळासाहेब पंधे व संगम गावचे सरपंच नारायण ताटे देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९३ वी जयंती संगम येथे मिरवणुकीस फाटा देत आनंदात साजरी करण्यात आली. यावेळी पंचक्रोशितील लोकांसाठी अन्नदान केले .तसेच ग्रामस्थांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या शिबिरात १११ रक्तदात्याने रक्तदान केले.

या रक्तदान शिबिरास महिलांचाही उस्फुर्त प्रतिसाद लाभला.यावेळी विठ्ठल ताटे केशव ताटे गणेश इंगळे प्रमोद माने नारायण महाडिक मधुकर ताटे कल्याण पराडे शिवाजी इंगळे तुळशीराम इंगळे संतोष ताटे दशरथ महाडिक रमेश इंगळे बबन पराडे वामन ताटे प्रकाश महाडिक सुनील ठोकळे प्रशांत ताटे संदीप महाडिक रमेश काकडे बंडू ताटे पंडित ताटे शेखर ताटे गणेश भोसले आकाश माने अक्षय महाडिक मेघराज ताटे विशाल महाडिक आकाश माने अण्णा केचे शरद ताटे संदीप ताटे संदेश ताटे दीपक लावंड दादा गवळी विकी ठोकले प्रशांत पवार फिरोज शेख मज्जिद मुलानी दत्तात्रय फुलारे इ ग्रामस्थ उपस्थित होते.



# कंपाउंड धनुर्धर जय, स्मृती आणि वैष्णवीने साधला सुवर्णवेध

## शालेय धनुर्विद्या स्पर्धा : ९ विभागातून २१६ धनुर्धरांचा सहभाग

**उस्मानाबाद : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय व महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व आर्चरी असोसिएशन ऑफ उस्मानाबाद डिस्ट्रिक्टच्या वतीने उस्मानाबाद येथील तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलावर आयोजित १४ वर्षे वयोगातील राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत कंपाउंड राउंड मध्ये पुणे विभागाचे जय जाधव व स्मृती विरपे, नाशिक विभागाची वैष्णवी परदेशी यांनी सुवर्ण वेध घेत स्पर्धेचा पहिला दिवस गाजविला.

स्पर्धेचे उदघाटन खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या दिवशी झालेल्या कंपाउंड राउंड प्रकारातील स्पर्धेचे बक्षीस वितरण खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे आणि जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रवीण गडदे यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर तालुका क्रीडा अधिकारी सारिका काळे, क्रीडा अधिकारी कैलास लटके, जिल्हा संघटनेचे सहसचिव अभय वाघोलीकर, स्पर्धा संचालक अशोक जंगमे, स्पर्धा निकाल विभाग प्रमुख अभिजित दळवी, नितीन जामगे, किरण शानमे आदींसह खेळाडू पालकांची प्रमुख उपस्तीथी होती.

स्पर्धेचा अंतिम निकाल अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कास्य पदक पुढील प्रमाणे मुलींमध्ये ५० मी १ मध्ये स्मृती विरपे ( पुणे विभाग ), वैष्णवी परदेशी ( नाशिक विभाग ), संजीवनी काचेवाड ( औरंगाबाद विभाग ), ५० मी २ मध्ये वैष्णवी परदेशी ( नाशिक विभाग ), स्मृती विरपे व रायांश वाबळे ( पुणे विभाग ) सर्वसाधारण वैयक्तिक सर्वसमावेशक वैष्णवी परदेशी ( नाशिक विभाग ), स्मृती विरपे ( पुणे विभाग ), संजीवनी काचेवाड ( औरंगाबाद विभाग ) सांघिक मध्ये पुणे विभाग, नागपूर विभाग व व कोल्हापूर विभाग.

तर मुलांमध्ये ५० मी १ मध्ये जय जाधव ( पुणे विभाग ), ओम मानकर व वेदांत लेछोडे ( नागपूर विभाग ), ५० मी २ मध्ये जय जाधव ( पुणे विभाग ), अन्वित जाधव ( नाशिक विभाग ), वेदांत लेछोडे ( नागपूर विभाग ), वैयक्तिक सर्वसाधारण मध्ये जय जाधव ( पुणे विभाग ), वेदांत लेछोडे व ओम मानकर ( नागपूर विभाग ) सांघिक मध्ये नागपूर विभाग, पुणे विभाग व कोल्हापूर विभाग अश्या प्रमाणे आहे.

# बार्टीच्या विभागप्रमुख पदी डॉ. सत्येंद्र चव्हाण

**अकलूज : प्रतिनिधी**



सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कोर्टी येथील डॉ. सत्येंद्र चव्हाण यांची बार्टीच्या विभाग प्रमुख पदी नुकतीच निवड झाली आहे. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

पशुसंवर्धन विभागात राजपत्रित अधिकारी म्हणून २४ वर्षे सेवा बजावलेले डॉ सत्येंद्र चव्हाण यांची डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे संस्थेत विभागप्रमुख विस्तार व सेवा या पदावर महाराष्ट्र शासनाने पुन्हा नियुक्ती केली आहे . डॉ बाबासाहेब आंबेडकर , छत्रपती संभाजीराजे व भिमा कोरेगाव युध्दाचे डॉ चव्हाण हे अभ्यासक असुन ते उतम लेखक विचारवंत व वक्ते आहेत . विस्तार सेवा विभागात डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे ऐतिहासिक स्मारके , निर्माण केलेली उपकेंद्रे याची देखभाल करणे , जतन करणे तसेच प्रकाशन व प्रसिद्धी विभाग , तांत्रिक विभागाने बांधकाम विषयक करावयाची कामे इत्यादी या विभागाच्या अधिनिस्त आहे.

राज्यातील समतादुत विभाग हा बार्टी मधील महत्वपूर्ण विभाग असून संस्थेच्या योजना जनतेपर्यंत,तळागाळात पोहोचवण्यासाठी नावलौकिक तसेच अज्ञातवासातील बहुजन समाजातील नायक महानायकचा इतिहास हा पुस्तक रुपाने संपादित करण्याचा मानस डॉ चव्हाण यांनी व्यक्त केला.त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातून येऊन अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी ही उंची गाठली असून त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होताना दिसत आहे.

# चंदूकाका सराफ अँड सन्स प्रा. लि.तर्फे फेब्रुवारीत 'मन्थ ऑफ लव्ह'

**सातारा : प्रतिनिधी**

नाविन्यता व आधुनिकतेचा मेळ साधत चंदुकाका सराफ ॲन्ड सन्स प्रा. लि. नेहमीच अप्रतिम दागिन्यांचे वैविध्यपूर्ण कलेक्शन्स सादर करीत असतात. फेब्रुवारी महिना म्हणजे आपल्या जिवलगाबद्दल प्रेम व्यक्त करण्याचा महिना. प्रेमी जीवांचे आकर्षण असणाऱ्या या दिवसाचे औचित्य साधून चंदुकाका सराफ ॲन्ड सन्स प्रा. लि., फेब्रुवारी महिन्यात 'मन्थ ऑफ लव्ह' म्हणून साजरा करणार आहे.

फेब्रुवारी महिन्यात जागतिक व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात येतो. आपल्या जोडीदाराविषयी वाटणाऱ्या प्रेमभावना व्यक्त करण्यासाठी चमचमत्या व पैलूदार हिऱ्यासारखा दुसरा कुठलाच अलंकार नाही. दि २६ फेब्रुवारीपर्यंतच्या काळात चंदुकाका सराफ ॲन्ड सन्स् प्रा. लि. द्वारे हिऱ्यांचे एक्सक्लुझिव्ह डिझाईन्स सादर केले जाणार आहेत. चंदुकाका सराफ ॲन्ड सन्स् प्रा. लि., महाराष्ट्र व कर्नाटक मधील सर्व शोरूम्स मध्ये महिनाच 'मन्थ ऑफ लव्ह' साजरा होणार आहे.

कलात्मक दागिन्यांच्या श्रेणीमध्ये आजच्या आधुनिक स्त्रीला साजेल अशा मनमोहक हिऱ्यांच्या दागिन्यांचे असंख्य प्रकार चंदुकाका सराफ ॲन्ड सन्स प्रा. लि., यांचे वतीने उपलब्ध केले आहेत. रोजच्या वापरासाठी हे हिऱ्यांचे दागिने असतील, हे या श्रेणीच खास आकर्षण आहे.

# विकास मिस्कीन यांची 'एम्स' संस्थेत प्राध्यापक म्हणून निवड

**अकलूज : प्रतिनीधी**

येथील शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक असलेले विकास मच्छिंद्र मिस्कीन यांची ऑल इंडिया इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल साइंसेस मंगलगिरी, आंध्रप्रदेश यांनी घेतलेल्या २०२२ या वर्षाच्या परिक्षेमध्ये नर्सिंग ट्यूटर किननीकल इंस्ट्रक्टर (प्राध्यापक) या प्रथम श्रेणी उश्र्ररी-अ पदी निवड झाली. हे यश संपादित केल्याबद्दल शिवरत्न संस्थेचे संस्थेच्या वतीने संस्थेचे मुख्यकार्यकारी अध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील व संस्थेच्या अध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांनी विकास मिस्कीन यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या वतीने विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थांना विकास मिस्कीन यांचे मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करण्यात आले होते.



यावेळेस मिस्कीन म्हणाले मी सात ते आठ वर्ष सतत विविध परीक्षा देत राहीलो.सातत्य ठेवले की,यश प्राप्त होते सातत्य ठेवले की,यश मिळतेच. ज्या वेळेस मला विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग कॉलेजला प्रवेश घ्यायचा होता तेव्हा माझी आर्थिक परीस्थिती नव्हती मात्र संस्थेचे अध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी मला महाविद्यालयात प्रवेश दिला वेळोवेळी मदत केली,त्यांचा मी कायम ऋणी राहीन. तसेच महाविद्यालयाने चांगले शिक्षक, पुस्तके, तज्ञ डॉक्टरांचे गेस्ट लेक्चर,शिबिरे,विविध विषयावरील कॉन्फरन्स उपलब्ध करून दिले विविधतापूर्ण उपक्रम राबविले,प्रात्यक्षिक अधारीत नर्सिंगचे शिक्षण दिले,या सर्व सोयीसुविधांनीयुक्त संसाधने पुरवले. यामुळेच स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्यास फायदा झाला.. मी सदैव विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयाचा कृतज्ञ असेन व आज जरी मी एम्स मध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत झालो तरी या संस्थेमुळे मी घडलो असल्याने एक बांधिलकी म्हणून आपल्या विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी एम्स मध्ये शिक्षणास नोकरीस कसे येतील यासाठी त्यांना मार्गदर्शन करत राहणार असे प्राध्यापक विकास मिस्कीन म्हणाले.

**आमच्या विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयात मधून आजपर्यंत ७०६ विद्यार्थी पासआऊट झाले त्यापैकी ५३५ विद्यार्थी चांगल्या नोकरीस आहेत त्यापैकी ३९० खाजगी हॉस्पीटल्स मध्ये कार्यरत आहेत तर ३५ विद्यार्थी विविध महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम पहात आहेत तर ७६ तर विद्यार्थी कम्युनिटी हेल्थ ऑफिसर म्हणून महाराष्ट्र शासनास सेवा बजावत आहेत तर ३ विद्यार्थी परदेशात काम करत आहेत.३ विद्यार्थी AIIMS मध्ये आहेत. आमचे मार्गदर्शक नेते माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी आम्हाला सांगितले होते की, मुलांना असे शिक्षण द्या की, शिक्षण घेतल्यानंतर त्याच्यां हाताला लगेच काम लागेल त्या दृष्टिकोनातून आम्ही नर्सिंग महाविद्यालयाची स्थापना केली व आज आमच्या महाविद्यालयाच्या ७०६ विद्यार्थ्यापैकी ५३५ म्हणेज ७६ % विद्यार्थी नोकरीस लागले ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.**

**- धैर्यशिल राजसिंह मोहिते-पाटील**
**कार्यकारी अध्यक्ष , शिवरत्न शिक्षण संस्था.**

# वाढदिवसानिमित्त ग्रंथालय, पुस्तक पेढी, अभ्यासिकेचे लोकार्पण

**अकलूज : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक नितीन बरडकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने सत्यशोधक विचारमंचतर्फे विविध लोकोपयोगी विधायक उपक्रम राबवून एक अनोखा संदेश दिला.

बरडकरमळा, नातेपुते येथील विचार मंचतर्फे नितीन बरडकर यांचे आजी आजोबा यांच्या स्मरणार्थ क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तक पेढी व अभ्यासिका याचा लोकार्पण सोहळा आई वडील वसंत व कुसुम बरडकर यांच्या हस्ते संपन्न झाला.



वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरात २२१ रुग्णांची नेत्र तपासणी व ४० रुग्णांना चष्मे प्रदान केले. सायंकाळी रागेश्री संगीत विद्यालय नातेपुते यांचा सदाबहार संगीत रजनी गायनाचा कार्यक्रम संगीत विशारद गायन मुकुंद गुळीग व तबला विशारद नागेश दीक्षित व विद्यालयाच्या शिष्यगणानी सादर केला. महात्मा ज्योतिबा फुले व सत्यशोधक समाज या विषयावर इतिहास अभ्यासक प्रशांत सरूडकर सर यांचे व्याख्यान तर प्रख्यात वक्ते बी एम पाटील सध्याची वाढदिवस पद्धती व वाढदिवसानिमित्त शुभचिंतन मनोगत झाले. तर ४५ वटवृक्षांचे औक्षण करून वटवृक्षाचे दान करण्यात आले.

लोकार्पण कार्यक्रमाला पंचकोशीतील राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षकवृंद, आजी माजी विद्यार्थ्यांनी उपस्थीती लावली. कार्यक्रम पार पाडण्या कामी सत्यशोधक विचार मंचाचे युवा कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

नितीन बरडकर यांनी ४५ व्या वाढदिवसानिमित्त वडिलांकडील आजी आजोबा कै. संतराम व कै. शेवंताबाई बरडकर आणि आईकडील अजी आजोबा कै. पंढरीनाथ व कै. लक्ष्मीबाई शिंदे यांचे स्मरणार्थ ग्रंथालय, पुस्तकपेढी व अभ्यासिकेचे लोकार्पण करून आजी आजोबांबद्दल अनोखी आदरांजली अर्पण केली.

# मालगाव येथून दुचाकीची चोरी

**सातारा :** मालगाव येथून दुचाकीची चोरी झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ५ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री अजित तात्याबा कदम रा. मालगाव ता. सातारा यांच्या राहत्या घरासमोर पार्क केलेली हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकी क्रमांक एमएच ११ बीई ६९२८ अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

याबाबतची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार डोंबाळे करीत आहेत.

# पाचवड येथून महिला डॉक्टर बेपत्ता

**सातारा : प्रतिनिधी**

पाचवड, ता. वाई येथील बसस्थानकाच्या हद्दीतून दि. १६ रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास महिला डॉक्टर प्रेरणा सुनील कुंभार (वय २६, रा. ओझर्डे, ता. वाई) या घरात कोणास काही न सांगता निघून गेल्या आहेत. कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला असता आढळून आल्या नाहीत. या प्रकरणी सुनील दत्तात्रय कुंभार (वय ३२, रा. ओझर्डे) यांनी भुईंज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


## साताऱ्यातून युवती बेपत्ता

**सातारा :** येथील एका महाविद्यालयात गेलेली प्रतीक्षा सुमीत पोतदार (वय २२, मूळ रा. वारणानगर, कोडोली, कोल्हापूर, सध्या रा. चिंचणेर निंब, ता. सातारा) ही दि. १६ रोजी सकाळी ११ च्या सुमारास कोणास काहीही न सांगता निघून गेली आहे.

.ती अद्यापपर्यंत बेपत्ता असल्याची फिर्याद सोमनाथ गजानन टंगसाळे (रा. चिंचणेर निंब) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

# महाशिवरात्रीनिमित्त क्षेत्र महाबळेश्वरात भाविकांची मोठी गर्दी





**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर तालुक्यातील एक पवित्र तीर्थस्थळ असलेल्या श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील पंचगंगा मंदिर, श्री महाबळेश्वर मंदिरासह पुरातन कृष्णामाई मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भाविक भक्तांची मोठी गर्दी केली होती. मंदिरांमध्ये पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

श्री महाबळेश्वर मंदिरांमध्ये केलेली आकर्षक अशी पुष्पसजावट लक्ष वेधून घेत होती क्षेत्र महाबळेश्वर परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते महाबळेश्वरवासीयांसह पर्यटकांची मोठी गर्दी पाहावयास मिळाली आ मकरंद पाटील यांनी देखील उपस्थित राहून मनोभावे पूजा केली यावेळी अर्बन बँक अध्यक्ष दत्तात्रय वाडकर राजेंद्र राजपुरे क्षेत्र महाबळेश्वर सरपंच सुनील बिरामने बाबुदादा कात्रट राजेंद्र पुजारी प्रदीप कात्रट नाना वाडेकर रोहित ढेबे अनिकेत रिंगे सचिन ढेबे आदी उपास्थित होते दुपारी जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी श्री महाबळेश्वर मंदिरास भेट देऊन दर्शन घेत पूजा केली याबरोबरच पुरातन अश्या कृष्णामाई मंदिरात देखील पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी भेट देऊन मनोभावे पूजा केली यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ शीतल जानवे-खराडे,पोलीस निरीक्षक संदीप भागवत पोउनि रौफ इनामदार अब्दुल बिद्री राजू मुलाणी यांच्यासह पोलीस अधीकारी कर्मचारी उपस्थित होते महाशिवरात्री दिवशी पहाटेपासूनच मंदिरांममध्ये दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती.

गेले काही दिवस महाशिवरात्रीच्या नियोजनासाठी तहसीलदार सुषमा चौधरी पाटील या बैठकांच्या माध्यमातून नियोजनाचा आढावा घेत होत्या तसेच जास्तीत जास्त भाविकांना सुलभ दर्शनासाठी विशेष अशी व्यवस्था करण्यात आली होती तसेच महाशिवरात्री निमित्त श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान ट्रस्ट,क्षेत्र महाबळेश्वर ग्रामपंचायतीसह सहयाद्री ट्रेकर्ससह विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या सहकार्याने नियोजन करण्यात आले होते.

# जनतेची काम एका दिवसात होण्यासाठी महाराजस्व अभियान हा चांगला उपक्रम - प्रांत मिनाज मुल्ला

## एका दिवसात २२०८५ प्रकरणांचा निपटारा

**मेढा : प्रतिनिधी**

माणसांच्या मूलभूत गरजांप्रमाणेच आता शासकीय दाखले,शासकीय कामे ही प्रत्येकाची आवश्यक बाब झाली आहे. दाखले, उतारे काढण्यासाठी अनेकांची धावपळ होते मात्र शासन आपल्या दारी उपक्रमा अंतर्गत महाराजस्व अभियान हा चांगला उपक्रम असून या अभियानात शासनाच्या विविध विभागांची कामे एका दिवसात होतात यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसे वाचतात असे प्रतिपादन प्रांताधिकारी मिनाज मुल्ला यांनी केले.




मेढा येथे शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत महाराजस्व अभियानात प्रांताधिकारी मुल्ला बोलत होते. यावेळी तहसीलदार राजेंद्र पोळ, परिविक्षाधीन तहसीलदार मयूर राऊत, नायब तहसिलदार संजय बैलकर, गटविकास अधिकारी रमेश काळे, शिवसेनेचे संपर्कप्रमुख एकनाथ ओंबळे, माजी जि प सदस्य अर्चना रांजणे माजी नगराध्यक्ष पांडुरंग जवळ, उपनगराध्यक्ष दत्तात्रय पवार, माजी सभापती अरुणा शिर्के, माजी उपसभापती सौरभ शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य विजय सुतार, माजी नगरसेवक विकास देशपांडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष शशिकांत गुरव, तालुका कृषी अधिकारी रमेश देशमुख, मुख्याधिकारी अमोल पवार, तालुका भूमी अभिलेख अधीक्षक तुषार पाटील, वन परिक्षेत्राधिकारी रंजनसिंह परदेशी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान मोहिते, कार्यकारी अभियंता सचिन बनकर, सामाजिक वनीकरण अधिकारी अंकिता तरडे, सहाय्यक निबंधक नानासाहेब रुपनवर, तालुकाप्रमुख शांताराम कदम, संजय सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात तहसीलदार राजेंद्र पोळ म्हणाले सरकार गेली दहा वर्षे महाराजस्व अभियान हा कार्यक्रम राबवत आहे. या अभियानात लोकांचे प्रश्न अडचणी व शासकीय काम एकाच वेळी व जागच्या जागी होण्यासाठी हे अभियान जनतेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे तसेच या अभियानाच्या माध्यमातून जनता आणि शासन यांच्यातील अंतर कमी करण्याचा हा सरकारचा प्रयत्न आहे या अभियानात शासनाचे सर्व विभाग सहभागी झाले होते. प्रत्येक विभागाचा स्टॉल उभारून नागरिकांच्या कामाचा एका दिवसात निपटारा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महसुली विभागाच्या वतीने विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

अभियान यशस्वी करण्यासाठी शोभा साठे, प्रशांत शिंदे, मनोज इंगवले, प्रफुल्ल बोरखडे, महेश भंडारे, दशरथ इटूबोणे, नेविल वराडे, मंडलाधिकारी संतोष मुळीक, यु. व्ही. डोईफोडे, केतन वैद्य, रमेश माने, पंकज शिंदे अधिक कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दरम्यान, आजच्या महाराजस्व अभियानात सेतू विभाग २६, संजय गांधी योजना विभाग २२, पुरवठा विभाग १९०, आधार कार्ड विभाग ५५, दाखले ७५१, पंचायत समिती ४३, आरोग्य विभाग ६१७, एकात्मिक बाल विकास ३, पशुसंवर्धन विभाग १७०, महावितरण ४६, राज्य परिवहन महामंडळ २०, तालुका कृषी विभाग ५७, जिल्हा बँक १२, सामाजिक वनीकरण ६०, मेढा नगरपंचायत ३ अशा एकूण २०८५ प्रकरणांचा एका दिवसात निपटारा करण्यात आला. कमी अवधीत अभियान यशस्वी करण्यासाठी तहसीलदार राजेंद्र पोळ व सर्व अधिकाऱ्यांनी मेहनत घेतली त्याबद्दल प्रांताधिकारी मिनाज मुल्ला यांनी अभिनंदन केले.

# भुयारी गटार योजना फक्त ठेकेदाराला पोसण्यासाठीच

## आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा शहरात सुरू असलेली भुयारी गटार योजना ही पांढरा हत्ती ठरली आहे. यामध्ये सत्ताधाऱ्यांना साताऱ्याच्या विकासाचे घेणेदेणे नाही त्यामुळे ही योजना केवळ ठेकेदाराला पोसण्यासाठी आहे असा घणाघाती आरोप आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पत्रकार परिषदेत केला.

शिवजयंती महोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तरे देताना शिवेंद्रसिंहराजे यांनी चौफेर टोलेबाजी केली.

ते पुढे म्हणाले, सातारा शहरात सध्या धुळीचे साम्राज्य आहे. साताऱ्यात सुरू असलेली भुयारी गटार योजना हा प्रशासकीय दृष्ट्या पांढरा हत्ती ठरली आहे. शहराच्या पूर्व भागात बोगदा ते बुधवार पेठ यादरम्यान या योजनेचे केवळ २० टक्के काम झाले आहे अजून दोन टप्प्यांमध्ये ही योजना संपूर्ण सातारा शहरात लागू करावयाची आहे. मोती चौक ते राधिका चौक यादरम्यानच्या स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावर सध्या धुळीचे साम्राज्य आहे. खडी टाकून सपाट करण्यात आलेला रस्ता ठेकेदाराने पुन्हा उचकटला असून त्यामुळे बुधवार पेठ, प्रतापगंज पेठ, बोगदा, राजवाडा परिसर येथे फक्त धुळीचे साम्राज्य आहे प्रशासक या नात्याने अभिजीत बापट यांनी या प्रकरणी हस्तक्षेप करून संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी त्यांनी केली. मात्र ठेकेदार हा निर्ढावलेला असून त्याला सातारकरांच्या आरोग्याची कोणतेच देणे घेणे नाही संबंधित आघाडीचे माजी नगरसेवक ते आणि त्यांचे ठेकेदार आणि त्यांची टक्केवारी यातच सध्या ते मश्गुल आहेत. भुयारी गटार योजनेसाठी एकाच ठिकाणी सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया केंद्र उभे करावयाचे होते मात्र सत्ताधाऱ्यांना ती जागा मिळू न शकल्याने आता प्रत्येक विभागांमध्ये एक एक एसटीपी उभारला जाणार आहे. मात्र प्रत्यक्षरीत्या ते जाग्या अभावी उभारणे अशक्य आहे त्यामुळे ही योजना केवळ पांढरा हत्ती आहे. ही योजना पुढे कशी राबवणार त्यामध्ये सातत्य राहणार का असे बरेच प्रश्न शिवेंद्रसिंहराजे यांनी उपस्थित केले.

शिवतीर्थ येथील छ. शिवराय पुतळा परिसराची रंगरंगोटी करण्यासंदर्भात शिवेंद्रसिंहराजे म्हणाले हा विषय तात्काळ सोडवला जाईल. राज्य शासनाकडून या कामासाठी ११ कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. त्याचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाने बनवला असून डीपीसी मधूनही त्याबाबत निधी देण्यात आला आहे. त्या आराखड्यानुसार योग्य ते बदल करून लवकरात लवकर ते काम मार्गी लावले जाईल तसेच अजिंक्यतारा किल्ल्याच्या जीर्णो द्धाराचा शंभर कोटीचा आराखडा नगर विकास विभागाला सादर करण्यात आला आहे. येथे विविध विकास कामे तसेच छत्रपती शाहू महाराजांची माहिती देणारे दालन ऐतिहासिक इमारतीची डागडुजी करण्याचे यासंदर्भात नियोजन आहे. तसेच लवकरच अजिंक्यतारा रस्त्याचे टेंडर काढले जाणार असून याकरिता सुद्धा निधी मंजूर झाला आहे. सातारा नगरपालिकेने लवकरात लवकर या विषयाची निविदा काढावी अशी मागणी शिवेंद्रसिंहराजे यांनी केली.

## २० फेब्रुवारी रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**सातारा : प्रतिनिधी**

माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. २० फेब्रुवारी २०२३ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे सकाळी ११ वा. करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे यांनी दिली.

महिला लोकशाही दिनामध्ये अर्ज करणाऱ्या महिलांनी अर्ज द्विप्रतीत करणे आवश्यक आहे. तक्रार अर्ज, निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असणे आवश्यक आहे. अर्जदार महिलांनी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक आहे. तद्नंतर येणाऱ्या महिला लोकशाही दिना दिवशी मुळ अर्ज व अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रासह महिला लोकशाही दिनास उपस्थित राहणे आवश्यक आहे.

# घरासमोर फटाके लावणारे निलेश मोरे यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी

## ठाकरे गटाचे शहरप्रमुख बाळासाहेब शिंदे यांची मागणी

**सातारा : प्रतिनिधी**

रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घरात सगळे झोपण्याच्या तयारीत असताना अचानक फटाके वाजवून परिसराची शांतता भंग करणारे व वयोवृद्धांना त्रास देणाऱ्या शिंदे गटाचे शहर प्रमुख निलेश मोरे यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे सातारा शहर प्रमुख बाळासाहेब शिंदे यांनी पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्याकडे भेटून करण्यात आलेली आहे.

पोलीस अधीक्षक समीर शेख यांची भेट ठाकरे गटाचे शहर प्रमुख बाळासाहेब शिंदे, सातारा तालुका प्रमुख रमेश बोराटे, उपशहर प्रमुख गणेश अहिवळे, विभाग प्रमुख सुमित नाईक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्याकडे बाळासाहेब शिंदे यांनी कैफियत मांडली की, माझ्या घरात माझी आई वयोवृद्ध आहे. आईला ब्लड प्रेशरचा त्रास आहे. रात्री साडेदहा वाजता घरासमोर फटाके वाजवल्याने आई भयभित झाली. निलेश मोरे यांच्या पाच ते सहा कार्यकर्त्यांच्या टोळक्याने फटाके रात्रीचे १०.३० वाजता फटाके वाजवले, ते वाजवायला नको होते. त्यांनी का फटाके रात्रीचे माझ्या घरासमोर वाजवले याची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये फटाके वाजवण्याचा प्रकार आलेला आहे, असेही त्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# जिल्ह्यात अवैध दारू विक्रीवर धाडी

**सातारा : प्रतिनिधी**

कोरेगावमधील बाजारपेठेच्या पुलाच्या पुढील बाजूस किरण तानाजी भंडलकर (वय २५, रा. दत्तनगर, कोरेगाव) याच्यावर कारवाई करुन २६ हजार रुपयांची देशी, विदेशी दारु जप्त केली. सातारा शहरातील जुना मोटार स्टँड येथील भाजीमंडईच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या जागेत अंजू बालाजी गौंड (रा. बुधवार पेठ, सातारा) हिच्यावर शाहूपुरी पोलिसांनी कारवाई केली. यात १ हजार रुपयांची ताडी जप्त केली. मुंढे, ता. कराड येथे गावच्या कमानीजवळ अमोल रघुनाथ कांबळे (वय ३६, रा. मुंढे) हा दारु विक्री करताना असताना कराड शहर पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली.

कटगुण, ता. खटाव गावच्या हद्दीत पुसेगाव ते दहिवडी रस्त्याला हॉटेलच्या पाठिमागे दारु विक्री करणाऱ्या अमोल रघुनाथ अवघडे (वय ३६, रा. वाठार, ता. कोरेगाव, सध्या रा. पुसेगाव, ता. खटाव) याच्यावर पुसेगाव पोलिसांनी कारवाई केली.

काढणे, ता. पाटण येथे बौध्द वस्तीलगत दारु विक्री करत असताना कृष्णत निवत्ती नांगरे (वय ४५, रा. काढणे) हा ढेबेवाडी पोलिसांना आढळला. त्याला नोटिस पाठवली आहे.


केंजळ, ता. वाई गाच्या हद्दीत राहत्या घरामागे अवैध दारु व्रिक्री करताना आढळल्याप्रकरणी संदीप पोपट सावंत (वय ५२) याच्यावर भुईंज पोलिसांनी कारवाई केली. खंडाळा गावच्या हद्दीत मच्छी मार्केटच्या शेजारील ओढ्यालगत विनोद काळू गायकवाड (वय ४३, रा. खंडाळा) हा दारु विक्री करत असताना खंडाळा पोलिसांनी कारवाई केली.

# म्हसवडकरांचे पाण्याचे हाल थांबणार, शहराचा सर्वांगीण विकास साधणार - आ. जयकुमार गोरे

**म्हसवड : प्रतिनिधी**

विकास हा नुसत्या बोलण्याने होत नाही तर त्यासाठी शासन दरबारी सतत पाटपुरावा करावा लागतो, म्हसवड पालिकेत आमची सत्ता नसताना केवळ म्हसवडकरांचे पिण्याच्या पाण्यासाठी होत असलेले हाल पाहुनच आपण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे याबाबत सातत्याने पाटपुरावा करुन शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी निधी मंजुर करु शकलो, विकासाच्या गप्पा मारुन कधीच विकास होत नाही असे सांगत यापुढे म्हसवड शहराचा सर्वांगीण विकास आपणच साधणार असल्याचे माण चे आ. जयकुमार गोरे यांनी सांगितले.

म्हसवड शहरासाठी ७९ कोटींची पाणीयोजना मंजूर करुन आणल्याबद्दल म्हसवडकर जनतेने बोराटवाडीतील निवास्थानी केलेल्या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.



**म्हसवड शहरासाठी ७९ कोटींची पाणीयोजना मंजूर करुन आणल्याबद्दल आ. जयकुमार गोरेंचा सत्कार करताना पदाधिकारी आणि नागरिक.**

यावेळी भाजपा तालुकाध्य शिवाजीराव शिंदे, मुख्याधिकारी डॉ.सचिन माने, माजी नगराध्यक्ष नितीन दोशी, विजय धट, सुरेश म्हेत्रे, डॉ. वसंत मासाळ, शंकरशेठ विरकर, शिवाजी लोखंडे , किरण कलढोणे, बी एम अबदागिरे, विठ्ठलराव सजगणे, लुनेश विरकर आणि मान्यवर उपस्थित होते.

आ. गोरे पुढे म्हणाले, सहा वर्षांपूर्वी आपली सत्ता यायच्या अगोदर म्हसवडची अवस्था अत्यंत दयनीय होती. आपण आपल्या सत्तेच्या काळात शहराचा विकासात्मक कायापालट केला, मात्र पुन्हा परिवर्तनवादी सत्ताधाऱ्यांनी शहराची अवस्था भयानक करुन ठेवली आहे. रस्ते, स्मशानभूमी बगिचासह अनेक प्रश्न आपण मार्गी लावले. आपण केलेल्या चांगल्या कामांना पवारांप्रमाणे त्यांनी खोडाच घातला. ज्यांना लाज नाही अशांनी रखडवलेली कामे शेवटी आम्हालाच मार्गी लावावी लागत आहेत. आठ वर्षे आपण उरमोडीचे पाणी नदीत सोडत आहोत. शहरवासियांना घरोघरी शुध्द पाणी देण्यासाठी आम्ही कटीबद्ध होतो म्हणूनच ७९ कोटींची योजना मंजूर केली आहे. आपण जनतेला २४ तास पाणी देणार आहोत. पाच वर्षे वाट पाहिली पण परिवर्तनवादी सत्ताधाऱ्यांनी काहीच केले नाही. पालिकेला त्यांनी भ्रष्टाचाराचे कुरण करुन टाकले आहे. दोन तोंडी विरोधी औलादींनी शहरावर आणलेले सहा वर्षांचे संकट लवकरच दूर होईल. आम्ही उभारलेल्या भाजी मंडईला साध्या काचा लावायचे काम त्यांना करता आले नाही, म्हणून कार्यकर्त्यांच्या, जनतेच्या आग्रहामुळे आम्ही मैदानात उतरुन विकासकामे हाती घेतली आहेत. पाणीयोजनेचे भूमिपूजन अधिवेशन संपताच उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करणार असल्याचेही आ. गोरेंनी सांगितले.

म्हसवडची गेल्या सहा वर्षात सत्ताधाऱ्यांनी कशी वाट लावली याचा पाढा अनेक पदाधिकाऱ्यांनी बोलताना वाचला. म्हसवडची तमाम जनता झालेली चूक सुधारण्यासाठी स्वयंस्फूर्तीने तयारीला लागली असल्याचेही अनेकांनी सांगितले.

**राष्ट्रवादीचा आमदार पाहिजे असेल तर जिहेकठापूरचे टेंडर थांबवा**

उत्तर माणमधील ३२ गावांना आंधळी धरणातून पाणी देण्यासाठी वाढीव योजना देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मी मंजूर करुन आणली. त्या योजनेचे टेंडर निघाले तर जयकुमार गोरे पुन्हा आमदार होईल, माणला राष्ट्रवादीचा आमदार पाहिजे असेल तर हे टेंडर काढू नका असे लोधवड्याच्या नेत्याने तत्कालीन मंत्री आणि पवारांना सांगितले होते. असल्या नतद्रष्ट आणि पापी प्रवृत्तींना मी नेहमीच पुरुन उरलो आहे. आता आमच्या सरकारच्या कार्यकाळात ते कामही लवकरच सुरु होत आहे असे आ. गोरेंनी सांगितले.

# कोयना प्रकल्पग्रस्तांसह एकंबे पंचक्रोशीचे होणार नंदनवन : आमदार महेश शिंदे

**कोरेगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण राज्याच्या कल्याणासाठी उभारण्यात आलेल्या कोयना धरणामुळे त्याग करावा लागलेल्या आमच्या भाऊबंदांना प्रकल्पग्रस्त म्हणून आजवर पाणी मिळू शकले नाही, ही मोठी शोकांतिका आहे. ज्यांनी जलसंपदा मंत्रिपद भूषवले त्यांनी देखील दहा वर्ष पाणी देण्याच्या नुसत्याच पोकळ घोषणा केल्या, मात्र प्रत्यक्षात पाण्याचा साधा थेंब देखील ते देऊ शकले नाहीत. मंत्रिपदाच्या माध्यमातून एक हेक्टर क्षेत्र साधे ओलिताखाली ते आणू शकले नाहीत. आता राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून कोयना प्रकल्पग्रस्त व एकंबे पंचक्रोशीला आता जिहे कठापूर उपसा जलसिंचन योजनेतून पाणी दिले जाणार आहे. त्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी टाकली जाणार असून त्याच्या सर्वेक्षणास आज प्रत्यक्ष प्रारंभ होत आहे, अशी माहिती आमदार महेश शिंदे यांनी दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत व्यापक बैठक घेत कोरेगाव मतदार संघातील पाणी प्रश्न संपुष्टात आणण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला होता, त्या अनुषंगाने त्यांनी या प्रकल्पाला तत्वतः मान्यता दिली आहे. शेल्टी गावापासून सर्वेक्षणास शुक्रवारी प्रत्यक्ष प्रारंभ झाला. त्याप्रसंगी शेल्टी, खिरखंडी, सिद्धार्थनगर, वाघजाईवाडी, जायगाव व एकंबे येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना आमदार शिंदे बोलत होते. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील खत्री, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहूल प्रकाश बर्गे, कोरेगाव विकास आघाडीचे अध्यक्ष राजाभाऊ बर्गे, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे तालुकाप्रमुख संजय काटकर, धोम प्रकल्पग्रस्तांचे नेते प्रा. टी. जे. सणस, सरपंच शीला अंकुश संकपाळ, उपसरपंच पुनम काशिनाथ संकपाळ, ग्रामपंचायत सदस्य यावेळी उपस्थित होते. आमदार महेश शिंदे पुढे म्हणाले की, कोरेगावच्या लोकप्रतिनिधींना जलसंपदा मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली, मात्र त्यांनी दुष्काळी भागासाठी वरदान ठरणारी जिहे कठापूर योजना कायमस्वरूपी बंद होण्यासाठी तिचे वर्गीकरण केले. आपल्या हक्काचे पाणी सांगली जिल्ह्याला दिले ,साताऱ्याचे पाणी बाहेर पळविण्यामध्ये हातभार लावला. स्थानिक जनतेला मात्र पाणी देतो, म्हणून बाता मारल्या. दहा वर्षे नारळ फोडण्याशिवाय दुसरे काही केले नाही. पिढ्यानं पिढ्या बरबाद करण्याचे दुर्दैवी काम त्यांनी केले, असा थेट आरोप त्यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गुरु लक्ष्मणरावजी इनामदार यांच्या नावाने ट्रस्ट स्थापन करून त्याद्वारे जिहे कठापूर उपसा जलसिंचन योजना मार्गी लावली असून तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेसाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजनेसाठी निधीची तरतूद करून सर्व प्रकारच्या मान्यता दिल्या. आज दुष्काळी भागामध्ये या योजनेचे पाणी पोहचले असून सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. दहा वर्षे आमदारकी मिळालेल्यांनी केवळ खोट्या बाता मारून जनतेची फसवणूक केली आहे. ही कामे कशी बंद पडतील यासाठी त्यांचा प्रयत्न असल्याचा आरोप करत आमदार महेश शिंदे यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांचे नेते राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोरेगाव मतदारसंघाचा पाणी प्रश्न सोडविण्याचा दिलेला शब्द खरा करून दाखवला आहे. आपल्या कोयना विभागातील शेल्टी, खिरखंडी, सिद्धार्थनगर गावांना पाणी देण्याचा निर्णय अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी घेण्यात आला होता. त्यासाठी तत्त्वतः मान्यता देखील त्यांनी दिली आहे. आजपासून सर्वेक्षण सुरू झाले असून डोंगराच्या पायथ्याला वन विभागाच्या हद्दीपासून जलवाहिनी नेली जाणार आहे. जेणे करून वन्य प्राण्यांना त्याचा त्रास होणार नाही, ते नागरी वस्तीत येऊन शेतकऱ्यांचे नुकसान करणार नाहीत. त्याचबरोबर डोंगर माथ्यावर जर वणवा लागला तर तो विझविण्यासाठी या पाण्याचा वापर देखील करता येणार आहे. असा हा बहुउद्देशीय प्रकल्प असून सर्वेक्षण झाल्यानंतर एका महिन्यात या प्रकल्पाला तांत्रिक मान्यता आणून देणार असल्याचा शब्द आमदार महेश शिंदे यांनी देताच टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

सुनील खत्री यांनी कोरेगाव तालुक्यात कोयना, धोम व कण्हेर प्रकल्पग्रस्त गावांचे पुनर्वसन झाले असून त्यातील युवा कार्यकर्त्यांचे संघटन केले जाईल. आमदार महेश शिंदे यांच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्त कार्यकर्त्यांना तालुकास्तरावर काम करण्याची निश्चितपणे संधी दिली जाणार असल्याचे सांगितले. कोयना धरणाच्या उभारणीपासून अनेक वर्ष पाण्यासाठी तडफडणाऱ्या या गावांना आमदार महेश शिंदे यांनी पाणी देण्याचा घेतलेला निर्णय अतिशय योग्य आहे. या निर्णयामुळे भविष्यकाळातील पिढ्यांना त्याचा निश्चित लाभ होणार असून हा भाग सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास देखील व्यक्त केला.

प्रारंभी आमदार महेश शिंदे यांनी गुरुवर्य लक्ष्मणरावजी इनामदार जिहे कठापूर उपसा जलसिंचन योजना विभागाच्या अभियंत्यांच्या पथकासमवेत शेल्टीच्या डोंगर पायथ्याशी जाऊन सर्वेक्षणाच्या कामाचा श्रीगणेशा केला. यावेळी प्रत्यक्ष पाहणी करून अभियंत्यांना योग्य त्या सूचना दिल्या.



शिखर शिंगणापूर : महाशिवरात्रीनिमित्त राजमाता कल्पनाराजे भोसले यांनी येथील शंभू महादेवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत सातारच्या माजी नगराध्यक्षा रंजना रावत उपस्थित होत्या.

# महाशिवरात्रीनिमित्त शिंगणापुरात भरला शिवभक्तांचा मेळा

## हर हर महादेवचा गजर; भाविकांमध्ये उत्साह

**दहिवडी : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूर याठिकाणी शनिवारी महाशिवरात्रीच्या दिवशी हजारो शिवभक्तांनी 'हरहर महादेव' च्या गजरात शंभू महादेवाचे दर्शन घेतले. कोटी लिंगार्चन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शिंगणापूर परिसर भक्तिमय झाला असून महाशिवरात्री निमित्ताने हजारो भाविकांनी दर्शन घेतले. महाशिवरात्रीनिमित्त राजमाता कल्पनाराजे भोसले यांनीही शंभू महादेवाचे दर्शन घेतले.

महाशिवरात्री उत्सवाच्या पर्वकाळात तीर्थक्षेत्र फाउंडेशनच्या वतीने शिंगणापूरमध्ये १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान कोटी लिंगार्चन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाशिवरात्रीच्या पुण्यकाळात शंभू महादेवाचे दर्शन व शिवलिंग पूजन असा सुवर्णयोग साधून भाविक शिंगणापूर नगरीत दाखल झाले आहेत. शनिवारी रात्री नऊपासून रविवारी सकाळी सहा वाजेपर्यंत प्रत्येक तासाला प्रहरपूजा करण्यात आली. शंभू महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकामध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. शनिवारी पहाटेपासूनच दर्शनासाठी शिवभक्तांच्या रांगा लागल्या होत्या. 'हरहर महादेव' गजरात दिवसभरात एक लाखावर शिवभक्तांनी शंभू महादेवाचे दर्शन घेतले. रात्री उशिरापर्यंत भाविकांचा ओघ सुरूच होता. सायंकाळी उशिरा राजमाता कल्पनाराजे भोसले यांनी शंभू महादेवास महापूजा करून दर्शन घेतले. त्यानंतर रात्री बारा वाजता शिवपार्वती व विष्णूलक्ष्मी शिवलिंगावर बेल वाहण्याचा सोहळा पार पडला. शिंगणापूरमध्ये सुरू असलेल्या कोटी लिंगार्चन सोहळ्यासही शिवभक्तांनी उपस्थिती लावली. महाशिवरात्री निमित्ताने शिंगणापुरात लाखो शिवभक्तांचा मेळा भरल्याचे चित्र दिसून आले. महाशिवरात्रीचे औचित्य साधून फुलांच्या माळा तसेच विद्युत रोषणाई करून मंदिराची आकर्षक सजावट केली होती. भाविकांच्या सोयीसाठी दहिवडी पोलीस तसेच शिंगणापूर पोलीस दूरक्षेत्र यांच्यामार्फत ४० पोलीस कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. महाशिवरात्री उत्सव पार पाडण्यासाठी देवस्थान समितीचे मंदार पत्की, ग्रामपंचायत प्रशासन, सर्व सेवाधारी, सालकरी पुजारी यांनी परिश्रम घेतले.

# सातारा जिल्ह्यात महाशिवरात्र पारंपरिक पद्धतीने साजरी

## विविध शिवमंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी गर्दी



महाशिवरात्रीनिमित्त क्षेत्र महाबळेश्वर येथील नागेश्वरच्या दर्शनासाठी झालेली भाविकांची गर्दी.
(छाया : संतोष मालुसरे, फुरूस, ता. जावली.)

**सातारा : प्रतिनिधी**

मध्यरात्रीपासून सुरू झालेले धार्मिक विधी,पहाटेपासून दर्शनासाठी लागलेली भाविकांची रांग, मंदिरात अखंड सुरू असलेला जप अशा भारावलेल्या जल्लोषपूर्ण वातावरणात सातारा जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी महाशिवरात्र उत्साहात साजरी झाली महाशिवरात्रीनिमित्त सातारा जिल्ह्यातील यवतेश्वर पाटेश्वर संगम माहुली क्षेत्र माहुली सातारा शहरातील कमानी होत परिसर शुक्रवार पेठ येथील कोटेश्वर मंदिर वासोटा किल्ला परिसरातील नागेश्वर अशा विविध ठिकाणी पारंपारिक पद्धतीने हर हर महादेव चा गजर करत पारंपारिक विधी पार पाडले.

महाशिवरात्र निमित्त कोटेश्वर मंदिर यवतेश्वर मंदिर येथे मंदिरांची रंगरंगोटी करण्यात आली होती रोषणाई आणि फुलांच्या आकर्षक सजावटीने सजलेली ही मंदिरे सगळ्यांची लक्ष वेधून घेत होती जिल्ह्यात दिवसभर ठिकठिकाणी शिव मंदिरांमध्ये महारुद्राभिषेक होम हवन महाप्रसाद कीर्तन व्याख्यान असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते ठीक ठिकाणी प्रसाद वाटण्यासाठी धार्मिक संस्थांच्या माध्यमातून स्टॉल उभारले गेले होते सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथील सिद्धनाथ मंदिरातील स्वयंभू शिवलिंग महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी खुले करण्यात आले होते शनिवारी रात्री हे भुयार दर्शनासाठी खुले केले गेल्याचे ट्रस्टचे चेअरमन महेश गुरव यांनी सांगितले हे भुयार फक्त महाशिवरात्रीच्या रात्री भाविकांना खुले केले जाते त्यामुळे येथे भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती लिंब कोटेश्वर सातारा शहरातील कोटेश्वर मंदिर तसेच वासोटा परिसरातील नागेश्वर मंदिर आणि येवतेश्वर या मंदिरांमध्ये सुद्धा भाविकांनी मोठी पदयात्रा करत महादेवाचे दर्शन घेतले.

श्रावणी सोमवार व महाशिवरात्रीला अनेक लोक श्री शंकराला बेलाची पाने अर्पण करतात या काळात विक्रेते बेलाची झाडे बोडकी करून पान विक्रीसाठी आणतात निसर्गाचे हे नुकसान टाळण्यासाठी कुरणेश्वर देवस्थानच्या वतीने एक बिल्व शिवार्पण हा जनजागृती पर कार्यक्रम जाहीर केला होता त्यानुसार भाविकांमध्ये याची जनजागृती करण्यात आली महाशिवरात्रीनिमित्त कोटेश्वर मंदिर परिसरामध्ये महाप्रसाद तसेच लघुरुद्र पठणाचे आयोजन करण्यात आले होते यवतेश्वर मंदिर परिसरातही महादेवाच्या अभिषेकासाठी मोठी गर्दी झाली होती.

# पतीविरोधात अपहाराचा गुन्हा दाखल

**सातारा : प्रतिनिधी**

वडिलांना धनादेशाद्वारे दिलेले २ लाख रुपये, सोन्या, चांदीचे दागिणे, मंगळसूत्र, संसारोपयोगी साहित्य परत न दिल्याप्रकरणी तसेच चारित्र्यावर संशय घेवून जाचहाट, विनयभंग केल्याप्रकरणी पत्नीने पतीविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

धनश्री संतोष शितोळे (वय २७, रा. कोडोली, ता. सातारा) यांनी फिर्याद दिली असून, याप्रकरणी पती संतोष उत्तम शितोळे, सासू कमल उत्तम शितोळे, दीर समाधान उत्तम शितोळे, जावू भाग्यश्री समाधान शितोळे (सर्व रा. कमल सदन, सोमनाथ कॉलनी, अमरलक्ष्मी स्टॉप, कोडोली, ता. सातारा) यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

ही घटना २०१६ ते फेब्रुवारी २०२३ दरम्यान घडली. पोलीस हवालदार सूर्यवंशी तपास करत आहेत.

# वडूजमध्ये महाशिवरात्री उत्साहात साजरी

## खटाव तालुक्यातील सर्व शिव मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा

**वडूज : प्रतिनिधी**

शिवभक्तांचा सर्वात प्रिय असलेला महाशिवरात्री हा उत्सव तालुक्यात सर्व शिवमंदिरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

खटाव तालुक्यातील तालुक्याचे ठिकाण असलेल्या वडूज शहरात श्री महादेव मंदिर ट्रस्टच्या वतीने श्री काशी विश्वेश्वर मंदिरामध्ये दरवर्षीप्रमाणे शिवलिलामृत ग्रंथाचा पारायण सोहळा संपन्न झाला.अनेक महिला शिव भक्तांनी रोज सकाळी सहा वाजता रुद्र अभिषेक व सकाळी ११ ते दुपारी १ वाजता शिव भक्त, माता-भगिनी शिवलीलामृत ग्रंथाचे वाचन केलं.

बुधवार दि १५ ते दि शुक्रवार १७ फेब्रुवारी पर्यंत संत ज्ञानेश्वर माऊली भजन मंडळ, दत्त भजनी मंडळ,





ब्रह्मचैतन्य भजनी मंडळ, वडूज ता. खटाव यांचे भजन व रात्री नऊ वाजता संत तुकाराम भजनी मंडळ, माऊली भजनी मंडळ, संत ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळ, वडूज ता. खटाव यांच्या वतीने भजन व जागर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचबरोबर शनिवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता श्री विश्वराध्याय रुद्र मंडल यांचे रुद्र पठण, सायंकाळी सात वाजता महाआरती व रात्री ९ ते १२.२७ वाजता श्री ह. भ. प. बाल कीर्तनकार माऊली महाराज जाहूरकर यांचे महाशिवरात्रीचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.रात्री १२.२७ मिनिटे ते १.१७ मिनिटे बेल अर्पण सोहळा कार्यक्रम झाला.

रविवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबारा ते रात्री नऊ वाजेपर्यंत कैलासवासी सदाशिव शिवाजीराव राऊत यांच्या स्मरणार्थ श्री मंगेश राऊत व श्री योगेश सतीश राऊत, सौ. योगिता अंकुश कुदळे (बोरगाव) यांच्यातर्फे महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.

तर वडूज परिसरातील सुप्रसिद्ध श्री तारकेश्वर मंदिरात ही महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# माजी खासदार राजू शेट्टी सरसेनापती गौरव पुरस्काराने सन्मानित



**वडूज : प्रतिनिधी**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापकअध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांना हिंदवी स्वराज्याचे दुसरे सरसेनापती प्रतापराव गुजर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने सरसेनापती गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. माढा लोकसभा खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, जेष्ठ विचारवंत डॉ आ ह साळुंखे आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या जन्म गावी भोसरे ता खटाव येथील आयोजित कार्यक्रमात माजी खासदार राजू शेट्टी यांनी आज अखेर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध अडचणी मध्ये स्वतः पुढाकार घेत आंदोलने करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. शेट्टी यांच्या बरोबरच प्रतिष्ठान च्या वतीने जेष्ठ इतिहास अभ्यासक प्रा. दत्ताजी नलवडे यांना ही सन्मानित करण्यात आले आहे.

हिंदवी स्वराज्याचे दुसरे सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या शौर्याची गाथा असलेले ''वेडात मराठे वीर दौडले सात'' या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

यावेळी कराड उत्तर भाजप नेते धैर्यशील दादा कदम, उपजिल्हाधिकारी विश्वासराव गुजर, खटाव तालुका भाजपा अध्यक्ष धनंजय चव्हाण, मा. सभापती संदीप मांडवे, राज्य प्रवक्ते अनिलभाऊ पवार, जिल्हा युवा अध्यक्ष तानाजीराव देशमुख, तालुकाध्यक्ष दत्तूकाका घार्गे, युवा नेते सूर्यभान जाधव, राज्य कार्यकारणी सदस्य सूर्यकांत भुजबळ, उद्योजक शरद खाडे, चेअरमन संतोष जाधव, कैलाजी गुजर, विष्णू श्रीपती गुजर, नवल थोरात, अनिलराव पवार, शहाजीराव गुजर, सौ. मोनिका कीर्तीकर, अनिल जाधव, सुनील जाधव, शुभांगी गुजर, वडूजचे नगरसेवक जयवंत पाटील, काकासाहेब बनसोडे, रवींद्र काळे आदींसह भोसरे ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# अजिंक्यतारा किल्ल्याने पुन्हा अनुभवला शिवकाल

## उजळणाऱ्या दिव्यातून साकारली शिवरायांची प्रतिकृती

**सातारा : प्रतिनिधी**

शिंग तुताऱ्यांचा नाद ,अखंड सळसळता उत्साह आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय रणभेदी घोषणा अशा उत्साही वातावरणामध्ये राजधानी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी किल्ले अजिंक्यतारा हजारो दिव्यांनी उजळला .आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत अजिंक्यतारा किल्ल्यावर राज सदरेचे पूजन करून महोत्सवाचा दुसरा दिवस शिवजयंतीच्या विविध उपक्रमांनी भारावला.




पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने या कार्यक्रमाला सुरुवात झाली यावेळी अजिंक्यतारा किल्ल्यावर हजारो सातारकरांनी हा नजारा डोळ्यात साठवण्यासाठी गर्दी केली होती तसेच सुमारे १००० उजळलेल्या पणत्यांमधून छत्रपती शिवरायांची अनोखी प्रतिकृती सादर करण्यात आली हे मनोहरी दृश्य रात्रीच्या अंधारामध्ये हजारो सातारकरांनी आपल्या डोळ्यांमध्ये साठविले आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले व पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शस्त्र प्रदर्शनाला सातारकरांनी जोरदार प्रतिसाद दिला तसेच अजिंक्यतारा किल्ल्यावरील गड पूजन राज सदरेचा सहवास आणि मशाल रॅली यामुळे अजिंक्यतारा किल्ल्याने साक्षात शिवकाळ अनुभवला करोनाचे निर्बंध पूर्णतः हटल्यामुळे यंदा शिवाजी जयंतीचा भरपूर जोश पाहायला मिळाला आमदार शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या राजधानी महोत्सवाची साताऱ्यात चांगलीच चर्चा सुरू होती.

# आयटक संलग्न जिल्हा पूर्व प्राथमिक शिक्षिका सेविका संघाचा बेमुदत संपाचा इशारा

**वडूज : प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्या शासनाने त्वरित मान्य कराव्यात, अन्यथा येत्या २० फेब्रुवारी पासून पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी बेमुदत संपात सक्रिय सहभागी होणार असल्याचे निवेदन आयटक संलग्न पूर्व प्राथमिक शिक्षिका सेविका संघाच्या वतीने बालप्रकल्प अधिकारी यांना वडूज येथे देण्यात आले.

अनेक दिवसांपासून सेविका, मदतनीस,मिनी अंगणवाडी ताई यांना शासकीय कर्मचारी दर्जा मिळावा, सेवानिवृत्त महिलांना ग्रॅच्युटी व मासिक पेन्शन मिळावी, अंतरिम वाढ, पोषण आहार वाढ, मिनी अंगणवाडी सेविकाना नियमित अंगणवाडी दर्जा मिळावा, रिक्त जागा त्वरित भराव्यात आदी विविध मागण्यांचं निवेदन देण्यात आले. संघाचे महासचिव शौकत भाई पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली बिट प्रमुख विजया भोकरे व सर्व सेविका, मदतनीस यांनी घोषणा देत शासनाने आपल्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा २० फेब्रुवारी पासून बेमुदत संप करणार असल्याचे सांगितले.

# बगाड यात्रा संदर्भातील गुन्हे विशेष शासनादेशाने दोन महिन्यातच घेतले मागे

## मदनदादांच्या प्रयत्नाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची साथ; ग्रामस्थांमध्ये समाधान

**बावधन : प्रतिनिधी**

कोरोना काळातील निर्बंध डावलून बगाड यात्रा काढणाऱ्या ग्रामस्थांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतचे आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनला २ महिन्यांपूर्वी दिले होते. माजी आमदार मदनदादा भोसले यांच्या प्रयत्नाने विशेष शासनादेशाने अवघ्या २ महिन्यातच यात्रा काळातील गुन्हे मागे घेतले गेल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.

मार्च २०२० व २०२१ या वर्षी महाराष्ट्रातील कोरोनाच्या महामारीमुळे साजऱ्या होणाऱ्या सण-उत्सवांवर निर्बंध लादण्यात आले होते. कोरोनाचा फैलाव होवू नये यासाठी विशेष खबरदारीचे उपाय म्हणून २०२० व २०२१ साली बावधनची बगाड यात्रा साजरी करू नये असे प्रशासनाने आदेश दिले होते. असे असताना लोकभावनेचा आदर म्हणून प्रशासनाच्या नियमातच राहूनच बावधन मधील ग्रामस्थांनी बगाड यात्रा साजरी केली होती. यामुळे बावधनमधील २०० ग्रामस्थांवर प्रशासनाने गुन्हे दाखल केले होते. त्याचा ग्रामस्थांना विशेषतः विद्यार्थ्यांना शासकीय भरतीसाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बगाड यात्रा साजरी करण्याने कोरोना फैलाव झालेला नसल्याने हे गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावेत अशा आशयाचे लेखी निवेदन माजी आमदार मदन दादा भोसले यांच्या नेतृत्वाखाली बावधन ग्रामस्थांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस यांना दिले असून गुन्हे मागे घेण्यासाठी विनंती करण्यात आली होती.

या निवेदनावर उपमुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस



यांनी मदनदादा भोसलेंसह बावधन ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करून लवकरात लवकर हे गुन्हे मागे घेण्याची ग्वाही दिली होती. त्यांनी जिल्हा प्रशासनाला त्वरित लेखी आदेश काढण्याच्या सुचना २ महिन्यापूर्वी दिल्या होत्या. अवघ्या २ महिन्यातच विशेष शासन आदेश काढून सगळ्या २०० ग्रामस्थांवरील गुन्हे मागे घेतले.

या संदर्भात विशेष शासन आदेशाने सगळे गुन्हे मागे घेतल्याचे आदेश न्यायाधीश आर. एन. भेंडे यांनी दिले. या प्रकरणी ॲड महेश शिंदे, ॲड विजय ठोंबरे, ॲड अर्जुन ननावरे, ॲड संजय खडसरे, ॲड राजेंद्र कदम, ॲड रविंद्र भोसले, ॲड जयंत गायकवाड, ॲड संभाजी भोसले, ॲड विक्रम मेणबुदले, ॲड सागर मोरे, ॲड दिग्विजय ठोंबरे, ॲड आगर भोईटे, ॲड सुनील सणस, ॲड उर्मिला पाटील, ॲड शाहीन पिंजारी यांनी विनामोबदला सहकार्य केले.

# छत्रपती शिवाजी मुस्लीम बिग्रेड माळशिरस तालुकाध्यक्षपदी जावेद तांबोळी

**अकलूज : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी मुस्लीम बिग्रेड माळशिरस तालुकाध्यक्षपदी सामाजिककार्यकर्ते जावेदबाबा तांबोळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आज शिवजयंतीनिमीत्त आयोजित केलेल्या मराठा सेवा संघ, संभाजी बिग्रेड व जिजाऊ बिग्रेड व अकलूज नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या शिवजयंत्ती उत्सव कार्यक्रमात माजी उपमुख्यमंत्री विजयसिह मोहिते पाटील यांच्या हस्ते सत्कार करून निवड केल्याचे जाहीर केले.

यावेळी किशोरसिंह माने पाटील, शिवतेजसिंह माने पाटील, डी.वाय. एस.पी. डॉ. शिव पूजेसाहेब पीआय अरुण सुगावकर, अकलूज नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी दयानद गोरे, ॲड. वजिर शेख, मराठा सेवा संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष उत्तम माने शेडगे, प्रसिद्ध शिवव्याख्याते ढवळे मॅडम, मराठा सेवा संघाचे माळशिरस तालुकाध्यक्ष डॉ. मोहिते तसेच संभाजी बिग्रेड तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ, युवक तालुकाध्यक्ष अमोळ मिसाळ व यावेळी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

